नि.फौ.ख.क्र.०३/२०१२
सरकार –वि– राजेशलाल
<u>निशाणी क्रमांक १६</u>

<u>साक्षीदाराचा पुरावा कलम २९९ फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार नोंदविण्यात आला.</u>

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– राजु रमेश खरे
वय :– ४५ वर्ष, व्यवसाय :– मजुरी
राहणार :– जलंब, ता.शेगांव, जि.बुलढाणा

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती टि.व्ही.बाहेकर यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. मी आरोपीला ओळखत नाही. पोलीसांनी मला पंचनाम्याचे कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशनला बोलाविले होते. पोलीसांनी माझी फक्त सही घेतली. पोलीसांनी माझेसमक्ष पंचनाम्याचे कोणतीही कार्यवाही केली नाही. आता मला अंगझडती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. हे म्हणने खरे नाही की दिनांक २४.०९.२००३ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशनमध्ये पंचनाम्याचे कार्यवाहीसाठी बोलाविले होते. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष आरोपीचे कपडे जप्त करुन अंगझडती पंचनामा तयार केला. हे म्हणने खरे नाही की सदर पंचनाम्यावर मी वाचुन समजुर सही केली. हे म्हणने खरे नाही की आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी फरार असल्यामुळे उलटतपास नाही**.

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

**माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.08.10 13:56:28 +0530

( एम. के. गोटे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १०.०८.२०२६.**

( एम. के. गोटे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – १०.०८.२०२६**